# 17 डिसेंबर

## आजचा सुविचार :

"जीवनात आव्हाने टाळण्याचा कोणताही पर्याय नाही, म्हणून एकतर त्यांचा सामना करण्यास शिका किंवा हार मानू नका."

## आजचे पंचांग:

वार – शुक्रवार
दिनांक : 17 डिसेंबर 2021
तिथी – मार्गशीर्ष
नक्षत्र – कृत्तिका
सुर्योदय – सकाळी 7.07 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 6. 03 वाजता

## आजचे दिनविशेष :

2016: लेफ्टनंट जनरल बिपीन रावत यांची लष्करप्रमुखपदी नियुक्ती झाली.

1928 : भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांनी ब्रिटिश पोलिस ऑफिसर जेम्स सॉंडर्स याची लाहोर येथे हत्या केली.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Guava – पेरू 2) Fig - अंजीर 3) Tamarind – चिंच 4) Pomegranate – डाळींब

## आजची प्रश्नमंजुषा :

1) कोणता प्राणी वाळवंटातील जहाज म्हणून ओळखला जातो?
2) पृथ्वीवरील उर्जेचा मुख्य स्त्रोत कोणता?
3) इंद्रधनुष्यात किती रंग असतात?
4) कोणत्या देशाला उगवत्या सूर्याची जमीन म्हटले जाते?

## बोधकथा :

### प्रामाणिक लाकुडतोड्या

एका गावात एक लाकुडतोड्या राहत होता. एक दिवशी तो दुपारी लाकुडतोड्ण्यासाठी नदीजवळ एक मोठ झाड होते तेथे गेला. झाड तोडत असतानाच त्याची अचनक कुराड पाण्यात पडते. लाकुडतोड्याकडे एक कुऱ्हाडअसते आणि नेमकी तीच कुऱ्हाड तो गमावतो.

त्याच्याजवळ दुसरी कुऱ्हाड विकत घेण्यासाटी पैसेपण पुरेसे नसतात.तो नदी जवळ बसतो आणि रडू लागतो. नदी उर्फ सरिता देवी त्याचे रडणे ऐकते. ती त्याच्या समोर प्रकट होते आणि विचारते , का रे ? का रडत आहेस तू ?' लाकूडतोड्या सारीतादेवीला गमवलेल्या कुऱ्हाडीबदल सांगतो.
सारीतादेवी अदृश्य होते. नदीतून परत येते तेव्हा तिच्या हातात सोन्यची कुऱ्हाड असते.ती लाकूडतोड्याला दाखवते.लाकुडतोड्या नम्रपणे म्हणतो देवी, ' ही माझी कुऱ्हाड नाही. मग देवी त्याला चांदीची कुऱ्हाड दाखवते.पुन्हा तो नकारार्थी मान डोलावतो आणि म्हणतो ' हे देखील नाही '. नंतर देवी त्याला लोखंडाची कुऱ्हाड दाखवते.लाकुडतोड्या म्हणतो ' होय हीच माझी कुऱ्हाड आहे माता!' देवी म्हणते तुझा प्रामाणिक पणा मला आवडला' या तीनही कुऱ्हाडी तुलाच ठेव माझा मुला.प्रामाणिकपणा मोठाच बक्षीस मिळवून देतो.

तात्पर्य : नेहमी खरे बोलावे.